VOL- VII ISSUE- I JANUARY 2020 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 6.293 ISSN 2349-638x

# विदर्भातील शहरी व ग्रामीण भागातील महाविद्यालयीन कबड्डी खेळाडूंच्या क्रिडाविषयक आर्थिक व सामाजिक समस्यांचा तुलनात्मक अभ्यास

प्रा. संदीप दामोधरराव मैंद
भगवंतराव कला विज्ञान महाविद्यालय,
एटापल्ली, जिल्हा– गडचिरोली

डॉ. संजयकुमार सिंह
प्राचार्य
शरदराव पवार कला व वाणिज्य महाविद्यालय,
गडचांदूर, जिल्हा– चंद्रपूर

## प्रस्तावना

भारतात कबड्डी हा खेळ अगदी पुरातन काळापासून खेळला जातो. विसाव्या शतकाच्या प्रारंभी म्हणजे पहिल्या दशकात श्री. दत्तात्रय आर. परांजपे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी 'गनिमी हुतूतू' या प्रकारचा खेळ खेळण्यास सुरवात केली. सन १९१९ मध्ये भारत स्वयंसेवक मंडळाने पूणे येथे के. के. बेंद्रे यांचे नेतृत्वाखाली 'संजीवनी हुतूतू' हा खेळ प्रथमत: खेळविला. सन १९२३ मध्ये कलकत्ता येथे एका छात्र संघ नावाच्या विद्यार्थी संघटनेचे प्रमुख होते. त्यांची कलकत्ता व बंगालमधील ग्रामीण भागात या खेळाची वाढ केली. संपूर्ण देशात हा खेळ एकाच नावाने व एकाच पद्धतीने खेळला जावा म्हणून अनेक कार्यकर्त्यांनी कठोर परिश्रम केले. वाटाघाटी केल्या. विचारांची देवाणघेवाण झाली. तडजोडी झाल्या व शेवटी १९५३ मध्ये हा खेळ 'कबड्डी' या नावाने व एकाच नियमावलीने खेळला जावा असे ठरले.

विविध संशोधनकर्त्यांनी आजवर केलेल्या संशोधनावरून असे निदर्शनास येते की कबड्डी या खेळाशी निगडीत खेळाडूंना वेगवेगळया समस्यांना सामोरे जावे लागते. का कारणाने विदर्भाच्या शहरी व ग्रामीण भागातील कबड्डी खेळाडूंच्या क्रीडा विषयक, आर्थिक व सामाजिक समस्यांचा तुलनात्मक अभ्यास शास्त्रीय व तंत्रशुद्ध पद्धतीने करणे आवश्यक आहे. विदर्भातील ग्रामीण व शहरी भागातील कबड्डी खेळाडूंची सामाजिक व आर्थिक समस्या समजुन घेऊन खेळाडूंच्या खेळावर होणारा परिणाम शोधून काढणे हा या संशोधनकार्याचा मुख्य उद्देश आहे. विदर्भातील नागपूर व अमरावती विभागातील शहरी व ग्रामीण भागातील महाविद्यालयांची अध्ययनाकरिता निवड करण्यात आली. संशोधनक्षेत्रातील कबड्डी खेळाडूंची सद्यस्थिती व पूर्वीच्या तीन वर्षाची माहिति सर्वेक्षणाद्वारे घेण्यात आली.

## संशोधन पद्धती

कोणतेही कार्य करतांना निश्चित मार्ग, दिशा, उद्देश ठरविणे अत्यंत आवश्यक आहे. दिशाहीन मार्गाचा आधार घेतल्यास संशोधन करतांना अनेक कठीण प्रसंगाना तोंड द्यावे लागते. म्हणून कार्यपद्धती समजून घेण आवश्यक आहे. संशोधनासाठी विदर्भातील शहरी व ग्रामीण भागातील महाविद्यालयीन कबड्डी खेळाडूंच्या क्रीडाविषयक आर्थिक व सामाजिक समस्यांची माहिती मिळविण्यासाठी प्रश्नावली तयार करण्यात आली व सर्वेक्षण माध्यमाने माहिती गोळा करण्यात आली.

## नमुना निवड

प्रस्तूत संशोधनाकरीता नागपूर व अमरावती विभागातील सर्व जिल्हयातील शहरी व ग्रामीण भागात असलेल्या महाविद्यालयातील कबड्डी खेळाडूंचा समावेश करण्यात आला. अमरावती व नागपूर अशा विदर्भाच्या दोन्ही प्रशासकिय विभागातून ८२५ कबड्डी खेळाडू निवडण्यात आले. ह्यांची निवड यादृच्छिक पद्धतीने करण्यात आली. यामध्ये अमरावती विभागातून ३७५ व नागपूर विभागातून ४५० असे ८२५ कबड्डी खेळाडू प्रस्तूत अभ्यासाकरिता निवडण्यात आले.

## माहिती संकलनाकरीता प्राथमिक स्त्रोत

संशोधनाच्या विषयानुरूप खेळाडूंच्या समस्या, अडचणी, खेळविषयक दृष्टीकोण या विषयाच्या प्राप्त माहितीतून आकडेवारी निश्चित करण्यात आल्या. प्रश्नावलीची निर्मीती मार्गदर्शकाच्या निर्देशानुसार करयात आली आणि सोबत या विषयाचे विशेषज्ञ व क्रिडाक्षेत्राशी निगडीत व्यक्तींचा सल्ला घेण्यात आला. प्रश्नावलीसाठी

पुस्तके व साहित्याची मदत घेण्यात आली. निर्मीत प्रश्न तांत्रिक व सुव्यवस्थित पद्धतीने मांडले गेले. प्रश्नांची रूपरेषा सर्वसाधारण, सरळ व स्पष्ट ठेवण्यात आली. संरचित प्रश्नावलीद्वारे विदर्भातील शहरी व ग्रामीण महाविद्यालयातील कबड्डी खेळाडूंकडून सर्वेक्षणाच्या माध्यमातुन माहिती मिळविण्यात आली.

**माहितीचे दुय्यम स्त्रोत**

प्रस्तुत संशोधनाकरिता माहितीच्या दुय्यम स्त्रोताच्या स्वरुपात शासकिय व खाजगी स्वरूपाची नियतकालिके, वर्तमानपत्रे, निरनिराळी पुस्तके, लेख इत्यादींचा आधार घेण्यात आला.

**आकडयांच्या संग्रह व सांख्यकीय विश्लेषण**

प्रस्तुत अध्ययनात संकलीत केलेल्या तथ्यांचे विश्लेषण SPSS 18.0 या सॉफ्टवेअर च्या मदतीने विविध सांख्यिकीय चाचण्यांचा उपयोग करून करण्यात आले. चाचण्यांची वैधता SPSS 18.0 च्या मदतीने निर्धारित करण्यात आली. संकलीत केलेल्या माहितीतून वारंवारिता, प्रतिशत प्रमाण इत्यादी निर्धारित करण्यात आली.

**सांख्यकीय विश्लेषण**

**खेळाडूंचे प्रवर्गानुसार वर्गीकरण**

**सारणी क्रमांक १:**

कबड्डी खेळाडूंचे प्रवर्गानुसार वर्गीकरण दर्शविणारी सारणी

| खेळाडूंचे जातीचे प्रवर्ग | शहरी | | ग्रामीण | |
|---|---|---|---|---|
| | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी |
| अनुसुचित जाती | ८२ | १८.६ | ७९ | १८.० |
| भटक्या व विमुक्त जाती | ४६ | १०.५ | ८२ | १८.६ |
| इतर मागास वर्गीय | २४४ | ५५.५ | १८४ | ४१.८ |
| खुला वर्ग | ६८ | १५.५ | ९५ | २१.६ |
| एकूण | ४४० | १००.० | ४४० | १००.० |

**काई वर्ग मूल्य:**— २३.०६५, **स्वातंत्र्यांश** — ३, **तालिका मूल्य:**—७.८२, P **मूल्य:**—<0.05

वरील सारणी क्रमांक १ मध्ये विदर्भातील शहरी व ग्रामीण भागातील महाविद्यालयीन कबड्डी खेळाडूंचे प्रवर्गानुसार वर्गिकरण दर्शविण्यात आले आहे.

- **शहरी भाग** : संशोधन क्षेत्रातील शहरी भागातील १८.६ टक्के खेळाडू अनुसुचित जातीतील असून १०.५ टक्के खेळाडू भटक्या व विमुक्त जातीतील असल्याचे आढळले. त्याचप्रमाणे ५५.५ टक्के खेळाडू इतर मागासवर्गीय तर १५.५ टक्के खेळाडू खुला प्रवर्गातील असल्याचे आढळले.
- **ग्रामीण भाग** : संशोधन क्षेत्रातील ग्रामीण भागातील १८.० टक्के खेळाडू अनुसुचित जातीतील असून १८.६ टक्के खेळाडू भटक्या व विमुक्त जातीतील असल्याचे आढळले. त्याचप्रमाणे ४१.८ टक्के खेळाडू इतर मागासवर्गीय तर २१.६ टक्के खेळाडू खुला प्रवर्गातील असल्याचे आढळले.

**३.२खेळाडूंच्या कुटुंबाची आर्थिक स्थिती**

**सारणी क्रमांक २:**

कबड्डी खेळाडूंच्या कुटुंबाची आर्थिक स्थिती दर्शविणारी सारणी

| कुटुंबाची आर्थिक स्थिती | शहरी | | ग्रामीण | |
|---|---|---|---|---|
| | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी |
| उच्च | ४८ | १०.९ | २७ | ६.१ |
| साधारण | २१७ | ४९.३ | १७६ | ४०.० |
| निम्न | १७५ | ३९.८ | २३७ | ५३.९ |
| एकूण | ४४० | १००.० | ४४० | १००.० |

**काई वर्ग मूल्य:**— १९.४८७, **स्वातंत्र्यांश** — २, **तालिका मूल्य:**— ५.९९, P **मूल्य:**—<0.05

वरील सारणी क्रमांक २ मध्ये विदर्भातील शहरी व ग्रामीण भागातील महाविद्यलयीन कबड्डी खेळाडूंच्या कुटुंबाची आर्थिक स्थिती दर्शविण्यात आली आहे.

- **शहरी भाग** : संशोधन क्षेत्रातील शहरी भागातील १०.९ टक्के खेळाडूंची कुटुंबाची आर्थिक स्थिती उच्च असल्याचे आढळले. त्याचप्रमाणे अनुक्रमे ४९.३ टक्के व ३९.८ टक्के खेळाडूंची कुटुंबाची आर्थिक स्थिती साधारण व निम्न स्वरूपाची असल्याचे आढळले.
- **ग्रामीण भाग** : संशोधन क्षेत्रातील ग्रामीण भागातील ६.१ टक्के खेळाडूंची कुटुंबाची आर्थिक स्थिती उच्च असल्याचे आढळले. त्याचप्रमाणे अनुक्रमे ४०.० टक्के व ५३.९ टक्के खेळाडूंची कुटुंबाची आर्थिक स्थिती साधारण व निम्न स्वरूपाची असल्याचे आढळले.

**३.३क्रीडा सहभागाकरीता वैय्यक्तीकरीत्या खर्च करणे**

**सारणी क्रमांक ३:**

कबड्डी खेळाडूंची क्रीडा सहभागाकरीता वैय्यक्तीक खर्च करण्याबाबत मत दर्शविणारी सारणी

| | शहरी | | ग्रामीण | |
|---|---|---|---|---|
| | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी |
| **होय** | ४३ | ९.८ | ३१६ | ७१.८ |
| **नाही** | ३३८ | ७६.८ | ७७ | १७.५ |
| **अनिश्चित** | ५९ | १३.४ | ४७ | १०.७ |
| **एकूण** | ४४० | १००.० | ४४० | १००.० |

**काई वर्ग मूल्य**:– ३७३.१०७, **स्वातंत्र्यांश** – २, **तालिका मूल्य**:– ५.९९, P **मूल्य**:–<0.05

वरील सारणी क्रमांक ३ मध्ये विदर्भातील शहरी व ग्रामीण भागातील महाविद्यालयीन कबड्डी खेळाडूंचे क्रीडा सहभागाकरीता वैय्यक्तीक खर्च करण्याबाबत माहिती मत दर्शविण्यात आले आहे.

- **शहरी भाग** : संशोधन क्षेत्रातील शहरी भागातील ९.८ टक्के खेळाडू क्रीडा सहभागाकरीता वैय्यक्तीक खर्च करण्यास समर्थ असून ७६.८ टक्के खेळाडू वैय्यक्तीक खर्च करण्यास असमर्थ असल्याचे आढळले. त्याचप्रमाणे १३.४ टक्के खेळाडूंनी क्रीडा सहभागाकरीता वैय्यक्तीक खर्च करण्याबाबत अनिश्चिती दर्शविली.
- **ग्रामीण भाग** : संशोधन क्षेत्रातील शहरी भागातील ७१.८ टक्के खेळाडू क्रीडा सहभागाकरीता वैय्यक्तीक खर्च करण्यास समर्थ असून १७.५ टक्के खेळाडू वैय्यक्तीक खर्च करण्यास असमर्थ असल्याचे आढळले. त्याचप्रमाणे १०.७ टक्के खेळाडूंनी क्रीडा सहभागाकरीता वैय्यक्तीक खर्च करण्याबाबत अनिश्चिती दर्शविली.

**३.४शैक्षणिक खर्च व खेळांकरीता आर्थिक सहाय्य**

**सारणी क्रमांक ४:** कबड्डी खेळाडूंच्या शैक्षणिक खर्च व त्यांना खेळांकरीता आर्थिक सहाय्य मिळण्याबाबत माहिती दर्शविणारी सारणी

| | शहरी | | ग्रामीण | |
|---|---|---|---|---|
| | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी |
| **होय** | ७८ | १७.७ | ३६९ | ८३.९ |
| **नाही** | ३०६ | ६९.५ | ४१ | ९.३ |
| **अनिश्चित** | ५६ | १२.७ | ३० | ६.८ |
| **एकूण** | ४४० | १००.० | ४४० | १००.० |

**काई वर्ग मूल्य**:– ३९९.६८१, **स्वातंत्र्यांश** – २, **तालिका मूल्य**:– ५.९९, P **मूल्य**:–<0.05

वरील सारणी क्रमांक ४ मध्ये विदर्भातील शहरी व ग्रामीण भागातील महाविद्यालयीन कबड्डी खेळाडूंच्या शैक्षणिक खर्च व त्यांना खेळांकरीता आर्थिक सहाय्य मिळण्याबाबत माहिती दर्शविण्यात आली आहे.

- **शहरी भाग** : संशोधन क्षेत्रातील शहरी भागातील १७.७ टक्के खेळाडूंना शैक्षणिक खर्चामुळे कुटुंबाकडून खेळाकरीता आर्थिक सहाय्य मिळत नाही तर ६९.५ टक्के खेळाडूंना कुटुंबाकडून खेळाकरीता आर्थिक सहाय्य मिळत असल्याचे आढळले. त्याचप्रमाणे १२.७ टक्के खेळाडूंनी कुटुंबाकडून खेळाकरीता आर्थिक सहाय्य मिळत नसण्याबाबत अनिश्चिती दर्शविली.
- **ग्रामीण भाग** : संशोधन क्षेत्रातील शहरी भागातील ८३.९ टक्के खेळाडूंना शैक्षणिक खर्चामुळे कुटुंबाकडून खेळाकरीता आर्थिक सहाय्य मिळत नाही तर ९.३ टक्के खेळाडूंना कुटुंबाकडून खेळाकरीता आर्थिक सहाय्य मिळत असल्याचे आढळले. त्याचप्रमाणे ६.८ टक्के खेळाडूंनी कुटुंबाकडून खेळाकरीता आर्थिक सहाय्य मिळत नसण्याबाबत अनिश्चिती दर्शविली.

**३.५वाढती महागाई व खेळांकरीता पालकांकडून आर्थिक सहाय्य**

**सारणी क्रमांक ५:**

वाढत्या महागाईमुळे कबड्डी खेळाडूंना पालकांकडून आर्थिक सहाय्य मिळण्याबाबत माहिती दर्शविणारी सारणी

| | शहरी | | ग्रामीण | |
|---|---|---|---|---|
| | संख्या | टक्केवारी | संख्या | टक्केवारी |
| **होय** | १०६ | २४.१ | ३८९ | ८८.४ |
| **नाही** | २६८ | ६०.९ | २८ | ६.४ |
| **अनिश्चित** | ६६ | १५.० | २३ | ५.२ |
| **एकूण** | ४४० | १००.० | ४४० | १००.० |

**काई वर्ग मूल्य**:– ३७७.१६६, **स्वातंत्र्यांश** – २, **तालिका मूल्य**:– ५.९९, P **मूल्य**:–<0.05

वरील सारणी क्रमांक ५ मध्ये विदर्भातील शहरी व ग्रामीण भागातील महाविद्यालयीन कबड्डी खेळाडूंना वाढत्या महागाईमुळे पालकांकडून आर्थिक सहाय्य मिळण्याबाबत माहिती दर्शविण्यात आली आहे.

- **शहरी भाग** : संशोधन क्षेत्रातील शहरी भागातील २४.१ टक्के खेळाडूंना वाढत्या महागाईमुळे पालकांडून आर्थिक सहाय्य मिळते तर ६०.९ टक्के खेळाडूंना पालकांकडून आर्थिक सहाय्य मिळत नसल्याचे आढळले. त्याचप्रमाणे

१५.० टक्के खेळाडूंनी वाढत्या महागाईमुळे आर्थिक सहाय्य मिळत नसण्याबाबत अनिश्चिती दर्शविली.

- **ग्रामीण भाग** : संशोधन क्षेत्रातील शहरी भागातील ८८.४ टक्के खेळाडूंना वाढत्या महागाईमुळे पालकांडून आर्थिक सहाय्य मिळते तर ६.४ टक्के खेळाडूंना पालकांकडून आर्थिक सहाय्य मिळत नसल्याचे आढळले. त्याचप्रमाणे ५.२ टक्के खेळाडूंनी वाढत्या महागाईमुळे आर्थिक सहाय्य मिळत नसण्याबाबत अनिश्चिती दर्शविली.

## ४.०निष्कर्ष

### ४.१खेळाडूंचे प्रवर्गानुसार वर्गीकरण

- अध्ययनात प्राप्त परिणामांवरून असे निदर्शनास येते की विदर्भातील शहरी व ग्रामीण भागातील बहुतांश खेळाडू इतर मागासवर्गीय या प्रवर्गातील आहेत.

### ४.२ खेळाडूंच्या कुटुंबाची आर्थिक स्थिती

- अध्ययनात प्राप्त परिणामांवरून असे निदर्शनास येते की विदर्भातील शहरी व ग्रामीण भागातील खेळाडूंच्या कौटुंबिक आर्थिक स्थितीमध्ये सार्थक फरक आहे. त्याचप्रमाणे शहरी क्षेत्रातील बहुतांश कबड्डी खेळाडूंच्या कुटुंबाची आर्थिक स्थिती साधारण व ग्रामीण क्षेत्रातील बहुतांश खेळाडूंच्या कुटुंबाची आर्थिक स्थिती निम्न स्वरूपाची आहे.

### ४.३क्रीडा सहभागाकरीता वैय्यक्तीकरीत्या खर्च करणे

- अध्ययनात प्राप्त परिणामांवरून असे निदर्शनास येते की, विदर्भातील शहरी व ग्रामीण भागातील कबड्डी खेळाडूंच्या क्रीडा सहभागाकरीता वैय्यक्तीक खर्च करीत असण्यामध्ये सार्थक फरक आहे. त्याचप्रमाणे शहरी क्षेत्रातील बहुतांश खेळाडू क्रीडा सहभागाकरीता वैय्यक्तीक खर्च करण्यास समर्थ नाही पण ग्रामीण क्षेत्रातील बहुतांश खेळाडू क्रीडा सहभागाकरीता वैय्यक्तीक खर्च करण्यास समर्थ आहेत.

### ४.४ शैक्षणिक खर्च व खेळांकरीता आर्थिक सहाय्य

- अध्ययनात प्राप्त परिणामांवरून असे निदर्शनास येते की, विदर्भातील शहरी व ग्रामीण भागातील कबड्डी खेळाडूंना शैक्षणिक खर्चामुळे कुटुंबाकडून खेळाकरीता आर्थिक सहाय्य न मिळत असण्यामध्ये सार्थक फरक आहे. त्याचप्रमाणे ग्रामीण क्षेत्रातील बहुतांश खेळाडूंना शैक्षणिक खर्चामुळे कुटुंबाकडून खेळाकरीता आर्थिक सहाय्य मिळत नाही तर बहुतांश शहरी खेळाडूंना कुटुंबाकडून खेळाकरीता आर्थिक सहाय्य मिळते.

### ४.५ वाढती महागाई व खेळांकरीता पालकांकडून आर्थिक सहाय्य

- अध्ययनात प्राप्त परिणामांवरून असे निदर्शनास येते की विदर्भातील शहरी व ग्रामीण भागातील कबड्डी खेळाडूंना वाढत्या महागाईमुळे पालकांकडून आर्थिक सहाय्य न मिळण्यामध्ये सार्थक फरक आहे. त्याचप्रमाणे ग्रामीण क्षेत्रातील बहुतांश खेळाडूंना वाढत्या महागाईमुळे पालकांकडून आर्थिक सहाय्य मिळते पण शहरी क्षेत्रातील बहुतांश खेळाडूंना पालकांकडून आर्थिक सहाय्य मिळत नाही.

## ५.० आधारग्रंथ सुची

1. ढोक, भ. म. (२००६). वर्धा जिल्ह्यातील नामवंत कबड्डी खेळाडूंची कामगिरी आणि त्यांचे कबड्डी खेळाच्या विकासात योगदान, लघु शोध प्रबंध नागपुर विद्यापीठाच्या एम.फिल पदवीसाठी सादर, पृ. ७१, ८८, ८९.
2. शिंदे, द., भेंडेगीरी, र व प्रसादराव ई. (१९९७). ''आधुनिक शास्त्रीय कबड्डी प्रशिक्षण'' पब्लिकेशन ताराराणी स्पोर्टस क्लब, कोल्हापूर पृ. १ ते ३.
3. वाखारकर, दि.गो. (२००६). “शारीरिक शिक्षा का आधुनिक स्वरुप तथा अध्ययन”, पान क्र. ७–१२.
4. घाटोळे प्रा.रा.ना. समाज शास्त्रीय संशोधन तत्वे आणि पध्दती श्री मंगेश प्रकाशन रामदासपेठ नागपूर १० चतुर्थ आवृत्ती १९९०.
5. बोधनकर डॉ. सुधीर – सामाजिक संशोधन पध्दती श्री साईनाथ प्रकाशन नागपूर १०, दुसरी आवृत्ती १९९९.
6. कऱ्हाडे डॉ. बी.एम., 'शास्त्रीय संशोधन पद्धती', पिंपळापूरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर २००७.
7. आगलावे, प्र., संशोधन पध्दती शास्त्र व तंत्रे, प्रकाशक–विद्याप्रकाशन नागपूर, प्रथम आवृत्ती २०००.
8. आगलावे, प्र. ''सामाजिक संशोधन पद्धती'' श्री साईनाथ प्रकाशन १ भगवाघर कॉम्प्लेक्स, धरमपेठ, नागपूर–१, २००६.
9. Biswas, M., Bauri, R and Halder, S. (2015). A Study on Personality Profile of Kabaddi Players, *Journal of Humanities and Social Science*, 20(10), pp. 8-10.

10. Green, K. (2008). Understanding Physical Education, Paul Chapman Publishing.
11. Jeyaraj, N and Gopinathan, P. (2014). Relationship of Selected Physical Fitness And psychological Variables To Kabaddi Playing Ability, *Indian Streams Research Journal*, 4(4), pp.1-6.
12. Rao, P. E. (1994). Modern Coaching in Kabaddi D.V.S. Publications, New Delhi, pp. 1&2.
13. Tomar, A., Sharma, V and Goswami, V. (2007). Assessment of Mental Health Status of Kabaddi and Kho-Kho Player, IRJMSH, 3(2), pp. 583-586.

Aayushi International Interdisciplinary Research Journal
ISSN 2349-638X
www aiirjournal.com